# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
|| मराठी तितुका मेळवावा ||

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

नोव्हेंबर २०१९
वर्ष ३९, अंक ११


## अध्यक्षीय



नमस्कार मंडळी,

आपल्यापैकी बहुतेकांनी आप्त-मित्रांसह रांगोळीच्या सप्तरंगात आणि खास दिवाळीच्या फराळासह उत्साहाने दिवाळी साजरी केली असेलच.

बृहन्महाराष्ट्र मंडळांतर्गत विविध मराठी मंडळांमध्येही दिवाळी निमित्त खास कार्यक्रम होत आहेत. असाच एक कार्यक्रम म्हणजे 'गूज अंतरीचे'. आमच्या कार्यकारिणीच्या पहिल्याच प्रयत्नाला, आपल्या सर्वांच्या पाठिंब्याने आणि शुभेच्छांसह सर्वच धागे जुळून आले, आणि भारतातून सुकन्या कुलकर्णी व त्यांच्या साथीदार कलाकारांचा 'गूज अंतरीचे' या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाला आठ शहरांचा दौरा निश्चित झाला. नवीन समितीने ऑगस्टमध्ये काम हाती घेऊन, लगेच P3 व्हिसाचे सर्व सोपस्कार पुरे केले, आणि ऑक्टोबरमध्ये पहिल्याच कार्यक्रमाचा दौरा सुरू झाला. या वायुवेगाने काम करण्याऱ्या भारतीय कार्यक्रम (India Programing) समितीचं विशेष कौतुक.

या पहिल्याच प्रयोगातील यशामुळे आमचा कामाचा उत्साह दुणावला, आणि 'रेशीमगाठी' हा वधू-वर सूचक संकेतस्थळाचा प्रकल्प अधिकच वेगाने २०२०सालाच्या जानेवारीपर्यंत आपल्या सेवेत रुजू करत आहोत. अगदी माफक दरात आपल्या बृहन्महाराष्ट्र कुटुंबातील घरचाच संदर्भ देऊन, खात्रीशीर स्थळ सुचवण्याचा आमचा प्रयत्न असेल. आमच्या या प्रयोगाला आपल्या सर्वांचाच भक्कम पाठिंबा लाभेल अशी आम्हाला खात्री आहे.

जशी दिवाळी येताना उल्हासाचे, आणि आनंदाचे वातावरण घेऊन येते, तशीच आता येणाऱ्या हिवाळ्याची चाहूल सुध्दा घेऊन येते. हिवाळ्यात जरी आपण थँक्स गिव्हिंग, ख्रिसमस या सणांमध्ये दंग असलो, तरी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे कार्यकर्ते मात्र, पुढील वर्षी येऊ घातलेल्या नाट्यमहोत्सवाची चाचपणी करण्यात गर्क आहेत. पुढील वर्षी मार्च - एप्रिलच्या सुमारास भारतातून तीन नाटके आणि प्रत्येक स्थळावर एक स्थानिक नाटक अशा स्वरूपाच्या नाट्यमहोत्सवाची आखणी जोरात चालू आहे. तेव्हा आमच्या पुढील सूचनेकडे लक्ष असूद्या.

येणाऱ्या भविष्यकाळात बृहन्महाराष्ट्र मंडळाला अधिक प्रगतीशील करण्यासाठी आम्ही 'Youth Team' प्रकल्पावर विशेष जोर देत आहोत. गेल्या महिन्याभरातच, सुमारे ४०हून अधिक स्वयंसेवकांची नोंदणी झाली आहे, आता या कामाला लवकरच गती येईल. आपल्या संस्कृती आणि परंपरा जपून पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या या कार्यात हे बिनीचे शिलेदार अग्रेसर असतील यात शंकाच नाही.

भारतातून येणाऱ्या कार्यक्रमाच्या व्हिसासंबंधी सध्याच्या वातावरणातली अडचण दूर करण्याचा आम्ही कसोशीने प्रयत्न करतो आहोतच; त्याचप्रमाणे, उत्तर अमेरिकेतील, क्षेत्रीय कलागुणांना प्रोत्साहन मिळावे म्हणून आम्ही Talent Transfer Form पाठवला आहे. आपल्या भरघोस प्रतिसादाची आम्हाला खात्रीच आहे.

मंडळी, पुन्हा एकदा दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छांसह येणारे हे नूतन वर्ष आपल्या सर्वांना सुखाचे, समृध्दीचे आणि आनंदाचे जावो हीच शुभेच्छा.

कळावे लोभ असावा,

आपली नम्र,


विद्या जोशी (अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ)

Vidya.joshi@bmmonline.org


## या अंकात...


'महाराष्ट्र मंडळ शिकागो'चा सुवर्णसोहोळा ३
'अक्षयभाषा' संस्थेच्या कार्यक्रमाचा वृतांत ४
पुस्तक परिचय: 'अमेरिकेतील मराठी कर्नल' ५
आमचा किंडरगार्टनमध्ये प्रवेश ७
पुनर्जन्म ८
Turmeric, the Golden Spice and a Cure for all Maladies! १०
शवपेटीत ३० तास
पुरवणी ई विभाग - राशिभविष्य: नोव्हेंबर, २०१९
यू ट्यूब विभाग- कथा- अभिवाचन
Matrimonial & Business Advertisements

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**

**स्थापना 1981 (शिकागो)**

**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**

Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com

**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**

Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription


**जाहिरातींचे दर**

पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100

पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील. पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२१)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष** | सोना भिडे | फिनिक्स, अॅरिझोना |
| **सदस्य:** | मिलिंद बावडेकर | अॅटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त/मताधिकार नसलेले सदस्य**

**माजी अध्यक्ष:** अविनाश पाध्ये, बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स्

**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष:** राहुल कर्णिक, डॅलस, टेक्सास

**सदस्य:** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन
नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

...



**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**संकेतस्थळ:** http://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**

vinata@gmail.com or newsletter@bmmonline.org
3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503

**पुरवणी - ई विभाग (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)**

**- राशिभविष्य: नोव्हेंबर, २०१९ -** दादा दामले (न्यू जर्सी)

**वाचण्यासाठी संकेतस्थळ:**
http://bmmonline.org/vrutta-esahitya

**बृ. म. मंडळ - यूट्यूब विभाग**

**कथा: 'आमचा किंडरगार्टनमध्ये प्रवेश'- ऑडिओ ऐकण्यासाठी संकेतस्थळ: Click here or visit:**
https://youtu.be/588Ev-DP7lI


**MATRIMONIAL**

Maharashtrian Bramhin family is loooking for a suitable Bride and Bridegroom (caste no bar) for their son and daughter presently located in the Mid-West but open to relocation.

**SON :** Age 42, USA Born tall - 6'-1", good looking, never married, hospital employed Physician, specializing in sleep and psychiatric medicine, well known and respected in his field.

**DAUGHTER:** Age 35, USA born, 5'-4", fair, good looking, never married, hospital employed physician, specializing in Neurology and sub -specialty.

Parents upper middle class, retired professionals (engineering and pediatrics) .

Looking forward to an early marriage.
Please contact at the earliest with photo, phone number and bio-data at family49100@yahoo.com

**Dr. Mohan Durve / CME Travels tours 2019-20**
**Contact: 888-794-1995 or 440-845-7272**
**mjdurve@sbcglobal.net**
***Japan (Cherry Blossoms) Mar 1-14, 2020 $5099***
**Northern Lights Iceland** wkly dept **Oct - Dec $2449**
***Germany with Oberammergau passion play (every 10 years) Aug 3 - 15, 2020 $4999***
**Bangkok , Vietnam, Cambodia, Laos, Bali 12/17-1/3 $4185**
**Beijing, Xian, Shanghai April 15 - 24, 2020 $2299**
**Australia-New Zealand every month $3999**
**South Africa every month $3099**
**South America every month $2999**
**S. American Cruise/Chilean fjords 12/16/20 $4699**
We specialize in private tours to any destination of your choice anytime of the year!

# ‘महाराष्ट्र मंडळ शिकागो’चा सुवर्ण सोहळा

**- अभिजित रायरीकर** (शिकागो, इलिनॉय)



ऑक्टोबर ११-१३ दरम्यान 'हेमेन्स कल्चरल सेंटर' मध्ये ८०० हून अधिक लोकांनी ‘महाराष्ट्र मंडळ शिकागो’चा पन्नासावा वाढदिवस मोठ्या धूमधडाक्याने साजरा केला. नवरात्र-दसरा-दिवाळी याच कालावधीत असल्याने तिन्ही सणांचा त्रिवेणी मिलाफही या कार्यक्रमात मंडळाने गुंफला होता. खाण्यापिण्याची रेलचेल, स्थानिक व भारतातून आलेले अनेक मनोरंजक कार्यक्रम, शिवाजी महाराजांचा पुतळा, किल्ला, देऊळ, व दरबाराची सजावट असलेले मनमोहक देखावे, ढोल ताशा पथक अशा अनेक करमणूकप्रधान गोष्टींनी भरलेला जणू खजिनाच रवी जोशींच्या नेतृत्वाखाली मंडळाने उपस्थितांना भेट केला.

कार्यक्रमाची सुरवात शुक्रवारी सायंकाळी रोहित पारेख यांच्या दांडियाने झाली. दिवसभराचे काम संपवून नंतर पारंपरिक पोशाखात गरबा व दांडिया खेळायला आलेल्या सर्वांचा थकवा त्या तालावर थिरकतांना पार नाहीसा झाला.

शनिवारी सकाळपासून सर्व उपस्थितांसाठी भरपेट नाश्त्यापासून अनेक कार्यक्रमांची भरगच्च पर्वणी वाट बघत होती. सर्वप्रथम 'एम एम सी गौरव' कार्यक्रमात नांदी, विनोदी नाट्य-प्रवेश, लावणी, नृत्य, अशा अनेक कलाकृती सादर झाल्या. या कार्यक्रमातील अतिशय कौतुकास्पद भाग म्हणजे गेल्या पन्नास वर्षातल्या प्रत्येक समितीच्या अध्यक्षांचा मंचावर बोलवून गौरव करण्यात आला. या सर्वांच्या कष्टाचे फळ म्हणून आज महाराष्ट्र मंडळ शिकागोने पन्नाशी दिमाखात पूर्ण केली, या भावनेने मंडळाने त्या सर्वांच्या प्रति अशी कृतज्ञता व्यक्त केली.

जिलबी रबडी सोबत दुपारच्या चविष्ट जेवणानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री अविनाश धर्माधिकारी यांनी 'सुवर्णस्मृती' या स्मरणिकेचे अनावरण केले व अनेक वर्षांच्या त्यांच्या समाजकार्याच्या प्रवासातील अनुभव सांगितले. विविध सामाजिक विषयांवर त्यांचे प्रगल्भ विचार सर्वांना अतिशय आवडले, आणि शिकागोकरांचे प्रेम पाहून काश्मीरसारख्या सध्याच्या ज्वलंत विषयांवर चर्चेसाठी पुन्हा वेगळ्या कार्यक्रमासाठी यायचे देखील कबूल केले. त्यानंतर दसऱ्याच्या निमित्ताने शिकागो मराठी शाळेतर्फे ७० मुला-मुलींनी गीत रामायणातील गाण्यांवर आधारित रामायण सादर केले. वय वर्षे ६ ते १६च्या या लहानग्यांच्या गोड अभिनयाने प्रेक्षकांकडून अनेक वेळा टाळ्या घेतल्या.

मराठी चित्रपटांच्या गेल्या ९० वर्षांच्या प्रवासावर आधारित 'सूरप्रवास-२' कार्यक्रमात १९२९ साली स्थापन झालेल्या ‘प्रभात’ कंपनी पासून ते १०० कोटी कमावणाऱ्या ‘सैराट’ या पहिल्या मराठी चित्रपटापर्यंत कालखंडातील अनेक चित्रगीते उत्तर-अमेरिकेतील कलाकारांनी सादर केली. गायकांना उत्साहाने साथ देत सुमारे १०० नर्तकांनी विविध नृत्यांतून कार्यक्रमाची शोभा वृद्धिंगत केली. या उत्कृष्ट कार्यक्रमाने मन भरल्यावर मग पोट भरायला मंडळींनी मूग डाळ हलव्याच्या जेवणावर ताव मारला. त्या रुचकर जेवणाला दाद देऊन प्रेक्षकवृंद नाट्य-सिने सृष्टीतील सुपरस्टार भरत जाधव आणि कलाकारांचे धमाल विनोदी नाटक 'पुन्हा सही रे सही' बघायला नाट्यगृहात डेरेदाखल झाले आणि अडीच तास सर्वांची हसून हसून पुरेवाट झाली. विविध रूपात निमिषार्धात वेषांतर करण्यासाठी भरत जाधवला नाटकाचा सेट जसा हवा होता तसाच शिकागोच्या स्थानिक कलाकारांनी हुबेहूब इतका सुंदर बनवला होता, की नाटक संपल्यावर भरतने त्यांचे अगदी मनापासून कौतुक केले.

रविवारी सकाळी पुन्हा इडली वड्याचा छान नाश्ता करून ८००+ प्रेक्षक मंडळी रत्नाकर मतकरी लिखित शिकागोच्या बेसमेंट थिएटर प्रस्तुत 'अश्वमेध' हे अतिशय चित्तथरारक नाटक बघायला नाट्यगृहात जमले, आणि सर्व कलाकारांनी आपल्या अफलातून अभिनयाने सगळ्यांना भारावून टाकले. शेक्सपीअरचा मॅकबेथ या नाटकाच्या अनुषंगाने एका आधुनिक रूपात सुनील मुंडले याने अत्यंत समर्थपणे उभा केला आणि सर्वांच्या टाळ्या घेऊन गेला. सर्वच कार्यक्रम इतके अप्रतिम - मग त्यात जेवण कसे मागे राहणार? गाजर हलव्याचे चविष्ट जेवण जेवून मंडळी मग 'जादूची पेटी' कार्यक्रम बघायला जमली. आदित्य ओक आणि सत्यजित प्रभू यांनी हार्मोनियम (पेटी) बद्दल माहिती आणि त्यावर विविध गाणी वाजवून दाखवत सुमारे अडीच तास अगदी मंत्रमुग्ध केले. पेटीतून अनेक इतर वाद्यांचे आवाज, अनेक हिंदी-मराठी सिने, नाट्य, व शास्त्रीय गाणी, सिंथेसायझरवर अनेक रचना व सोबत तबल्यावर 'सूर नवा ध्यास नवा' फेम प्रसाद पाध्ये यांची अफलातून साथ हा खरोखरच जादूचा प्रयोग होता.

मध्यंतराला चहा कॉफी सोबत बटाटेवडे खाऊन सर्वजण सुबोध भावे सोबत ‘रुबरु’ गप्पागोष्टी करायला परतले. सुबोधने कॉलेज जीवनापासून आपल्या नाट्य आणि सिने सृष्टीतील प्रवासाचे कथन अतिशय हृदयस्पर्शी पध्दतीने केले आणि रसिकांची मने जिंकली. या प्रवासात कसे मित्र भेटत गेले आणि अभिनय, शास्त्रीय संगीताचे अनुभव आणि त्याच्यामुळे 'कट्यार' आणि 'बालगंधर्व'मधील भूमिका यातून त्याची कारकीर्द कशी बहरली याचे अतिशय छान वर्णन केले.

या कार्यक्रमांच्या सोबत लहान मुलांसाठी अनेक कार्यक्रमदेखील होते. रामदास पाध्ये यांच्या बोलक्या बाहुल्या, STEM-कार्यशाळा, ‘फेस-पेंटिंग’, मुलांसाठी खास चित्रपट, नृत्य-कार्यशाळा, इत्यादी अनेक रंगतदार कार्यक्रमात सर्व लहानगे मंडळी एका वेगळ्या हॉलमध्ये रमले होते. अर्थात ‘रामायण’

आणि 'सूर-प्रवास' या कार्यक्रमांना त्यांनाही खास आमंत्रण होते. आणि छोट्यांसाठी त्यांच्या आवडीचे पदार्थ जेवणात होतेच, त्यामुळे तेही खुश आणि त्यांचे पालकही खुश!

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने शिकागो महाराष्ट मंडळाने २०१९च्या अध्यक्षा वैशाली राजे यांच्याकडून मंडळाची धुरा २०२०चे अध्यक्ष समीर सावंतकडे सोपवली आणि मावळत्या समितीच्या सदस्यांचा गौरव व नव्या समितीच्या सदस्यांची ओळख करून दिली. संयोजकांनी मग सर्व १५०+ कार्यकर्त्यांना मंचावर बोलवून उत्कृष्ट आयोजनाबद्दल आभार व्यक्त केले.

तीन दिवसांच्या 'मिनी-बी एम एम' अधिवेशनासमान सुवर्णमहोत्सवानंतर भारावलेले उपस्थित सर्वजण अनेक छान, गोड स्मृती आणि 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'तर्फे दिलेला दिवाळीचा फराळ व भेटवस्तूंनी भरलेली पिशवी घेऊन परत निघाले तेव्हा मंडळाचे स्वयंसेवक आवराआवरी करत होते.. आणि नजिकच्या भविष्यात बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन शिकागोत करण्याचे आराखडे बांधत होते.

आभार: कार्यक्रमाची धुरा वाहणारी मुख्य समिती: संयोजक-रवी जोशी, सह संयोजक-समीर सावंत, चिटणीस-मृणाल जोगळेकर, खजिनदार-आशिष नगरकर.

***

# 'अक्षयभाषा' संस्थेच्या कार्यक्रमाचा वृत्तांत

- **माधुरी बापट** (थॅचर, ॲरिझोना)

फिनिक्समधील 'अक्षयभाषा' ही डॉ. भाग्यश्री बारलिंगे हिने २००५ साली सुरू केलेली विना नफा संस्था आहे. त्यात एकांकिका, प्रसिध्द मराठी लेखकांच्या मुलाखती, गाण्याचे कार्यक्रम होत असतात. www.akshaybhasha.org या संकेतस्थळावर त्यातील काही कार्यक्रम बघता येतील. नुकताच झालेला डॉ. अरुणा ढेरे यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम बघण्यासारखा आहे. अलिकडेच टॅंपी व चॅंडलर पब्लिक लायब्ररीतून मराठी पुस्तकांचे विभाग सुरू केले आहेत. ही गोष्ट खूपच कौतुकास्पद आहे.

भाग्यश्रीच्या उत्साह, ऊर्जेला सीमा नाही. मी मोठ्या अपेक्षेने २५ ऑगस्टच्या कार्यक्रमाला आवर्जून गेले होते. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता फिनिक्स भागात, प्रामुख्याने चॅंडलरमध्ये शाळांतून मराठी, हिंदी सारख्या भारतीय भाषा 'ऑप्शनल फॉरिन लॅंग्वेज' म्हणून शिकवायची शक्यता आहे का, यावर परिसंवाद व लोकांचे त्यावर प्रतिसाद अजमावणे.

पॅनेलवर पाच लोक होते. ॲरिझोना स्टेट युनिव्हर्सिटीतील मराठी भाषा व महाराष्ट्रावर काही कोर्सेस शिकवणाऱ्या डॉ. ॲन फेल्डहॉस, ॲरिझोना स्टेट डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशनच्या टॅमी वॉकर, चॅंडलर स्कूल डिस्ट्रिक्टच्या जेमी मक्ब्राईड, डॉ. मेधा बुद्रुक, शेख शॅम्स आणि डॉ. राहुल कोदे. डॉ. ललिता अभ्यंकर व भानू काळे यांचे मराठी विषयीच्या अनुभवांचे व्हिडीओ दाखवले.

कार्यक्रमाची सुरवात दुपारी दीड ऐवजी अडीचला झाली. फक्त पॅनेलवरच्या स्त्रियांनाच अत्तर, गुलाब देऊन त्यांचे स्वागत झाले. याची जरा गंमत वाटली. स्वत:च्या घरात असे स्वागत छान वाटते. पण पब्लिक लायब्ररीत मला तरी जरा विसंगत वाटले. सुरेश भटांचे 'बोलतो मराठी' हे गाणे चांगले म्हटले. पु.लंच्या 'ती फुलराणी' या नाटकाची नांदी 'होते स्वर बारा' हे गाणेपण म्हटले गेले. त्यावर भरतनाट्य सादर केले गेले. नऊवारी नेसलेली, नथ घातलेली मराठी वेषातली स्त्री जास्त शोभली असती.

डॉ. ॲन फेल्डहॉसचे बोलणे मला नेहमीच आवडते. पण त्या मराठीत बोलल्या नाहीत. तशा त्या एकट्याच पूर्ण हॉलमध्ये साडी नेसलेल्या खऱ्या मराठी स्त्री होत्या. साठ पासष्ठ लोकांची उपस्थिती होती. त्यात पंजाबी वा पाश्चात्य स्त्रिया होत्या. त्यांनी सांगितलेला एक अनुभव लक्षात रहाणारा आणि गंमतशीर वाटला. एका कॉन्फरन्समध्ये त्या एका रशियन प्रोफेसरला भेटल्या. यांचे रशियन जेवढे वाईट तेवढेच त्यांचे इंग्रजी वाईट. पण दोघींचे मराठी उत्तम. म्हणून दोघींचे बोलणे मराठीत झाले.

टॅमी वॉकर व जेमी मक्ब्राईड या दोघींचे सादरीकरण तयारीचे व व्यावसायिक दर्जाचे असे होते. नवी भाषा शाळेत सुरू करण्याविषयीचे तंत्र, त्यांची होणारी वाढ याविषयीची आकडेवारी त्यांनी दाखवली. काहीजणांना ती माहिती अनावश्यक वाटली असण्याची शक्यता आहे. परंतु कुठलाही नवा विषय सुरू करताना त्याचा दीर्घकालीन टिकावूपणा (sustainability) बघावा लागतो.

मेधा बुद्रुक हिने नैजेरियात वाढत असतांना तिच्या आईवडिलांनी मुलांना मराठी शिकवण्यासाठी केलेले प्रयत्न सांगितले. शेख यांनी रविवारच्या शाळातून आपली बंगाली भाषा शिकवायच्या प्रयत्नाविषयी ऐकवले. मला वाटतं, राहुल कोदेला वेळेअभावी बोलायला फार संधीच मिळाली नाही. पाच वाजता लायब्ररी बंद होत असल्याने कार्यक्रम थांबवावा लागला. त्यामुळे प्रेक्षकातील लोकांना काही बोलायची संधी मिळाली नाही.

असे कार्यक्रम ठरवून ते व्यवस्थित पार पाडणे हे एक मोठेच आव्हान असते. विशेषत: जेव्हा त्यात अभारतीयांचा सहभाग असतो. करण्यापेक्षा सांगणे सोपे असते. तरी काही गोष्टी टाळता आल्यास वा जास्त चांगल्या करता आल्या तर आपला हेतू साध्य होऊ शकतो. नुसत्याच आठवणी वा अनुभव मांडण्याऐवजी त्यावर आर्टिक्युलेशन झाले तर ते प्रभावी होते. प्रत्येकाने वेळेचे बंधन पाळणेही आवश्यक आहे. कार्यक्रम वेळेवर सुरू करणे व वेळेवर संपवणेही महत्वाचे आहे. विशेषत: प्रोफेशनल लोकांबरोबर तुम्ही कार्यक्रम ठरवता, तेव्हा तर जास्तच.

गेली दहा वर्षे फिनिक्समध्ये दोन ठिकाणी मराठी शाळा रविवारी चालू आहेत. त्यातल्या विद्यार्थ्यांची संख्या किती पासून, किती पर्यंत पोचली आहे; अमेरिकेत रविवारी भरणाऱ्या एकूण चाळीसहून जास्त मराठी शाळांमध्ये गेल्या चाळीस वर्षात विद्यार्थ्यांची संख्या किती पासून कितीपर्यंत पोचली आहे, फिनिक्समध्ये गुजराती भाषेच्या शाळेत किती संख्येने मुले शिकतात, हिंदीच्या शाळेत किती मुले शिकतात, अमेरिकेतील इतर प्रांतातील किती शाळांतून हिंदी वा गुजराथी वा मराठी भाषा शिकवल्या जातात... अशी माहिती देणं महत्वाचं आहे. मराठी शाळेच्या एखाद्या शिक्षिकेने थोडा अभ्यास करून माहितीपूर्ण असे छोटे 'प्रेझेंटेशन' दिले असते तर ते उपयोगी ठरले असते.

आपली भाषा, आपली संस्कृती म्हंटलं, की आपला उत्साह नेहमीच उतू जात असतो. परंतु त्यावर जरा लगाम घालून कार्यक्रमांतून आपला हेतू साध्य करण्याकडे लक्ष केंद्रित करणं महत्वाचं असतं. भाग्यश्रीवर त्या दिवशीच आकस्मितपणे ओढवलेल्या आपत्तीतूनही हा कार्यक्रम तिने पार पाडला ही गोष्ट वाखाणण्यासारखी आहे.

***

## पुस्तक परिचय: 'अमेरिकेतील मराठी कर्नल'

**- मोहन रानडे** (फिलाडेल्फिया)

आज ८० वर्षांचे असलेले डॉ नारायण जयरामराव देशमुख हे मूळचे विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा गांवचे. हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठातून चार सुवर्णपदके मिळवून १९६१ साली वैद्यक विषयाचे ते पदवीधर झाले आणि १९६४ साली प्रथम क्रमांकाने एम. एस. पदवी प्राप्त केली.




लष्करी पेशाची शाळेपासून आवड असल्याने शाळेत एन. सी. सी. कॅडेट आणि कॉलेजात एन. सी. सी. ऑफिसर (लेफ्टनंट) या हुद्यांवर त्यांनी काम केले होते. मात्र पायाला झालेल्या किरकोळ दुखापतीमुळे भारतीय सैन्याने त्यांना वैद्यकीय तपासणीत अनुत्तीर्ण केले. त्यामुळे भारतीय सैन्यात भरती व्हायचे त्यांचे स्वप्न त्यावेळी अपुरेच राहिले. पाच वर्षे हैद्राबाद येथील गांधी मेडिकल कॉलेजात असिस्टंट प्रोफेसर ऑफ सर्जरी म्हणून काम केल्यावर १९६९ साली ते सपत्निक अमेरिकेला आले तेव्हां ते ३१ वर्षांचे होते.

सेयर पेन्सिल्व्हेनिया येथे व्हॅस्क्युलर सर्जन म्हणून व्यवसाय चालू होता, संसार उत्तम चालू होता. तरी सैन्यात भरती व्हायची उमाळी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्या स्वप्नाची थोड्याफार प्रमाणात पूर्ती करण्यासाठी त्यांनी १९८४ साली अमेरिकन राखीव लष्करात जाण्याचे ठरविले आणि मेजर या हुद्द्यावर दाखल झाले.

त्यानंतरचा २१ वर्षांचा लष्करी राखीव दलातील प्रवास म्हणजे 'अमेरिकेतील मराठी कर्नल' हे पुस्तक. या काळात डॉक्टरांनी काय केले नाही? - चार युध्दात (कुवेत, कोसोव्हो, इराक, अफगाणिस्तान) आणि दक्षिण अमेरिकेतील चार लष्करी मानवता सेवेत (होंडुरास, बोलिव्हिया, इक्वेडोर, ग्वाटेमाला) भाग घेतला, मेरीट बॅचेस मिळवण्यासाठी अपार शारीरिक कष्ट होणारे प्रशिक्षण घेतले आणि ते सुध्दा वय वर्षे ४६ ते ६७ या २१ वर्षांच्या कालखंडात आणि स्वत: कर्करोगासारख्या दुर्धर रोगाशी लढत असताना! लष्कराच्या मानवता सेवेसाठीची मोहीम असो अथवा प्रत्यक्ष रणांगणावर जखमी सैनिकांना शुश्रुषा देण्याची कामगिरी असो, प्रत्येक मोहिमेची वेगवेगळी आव्हाने होती. ती आव्हाने पेलीत आणि स्वत:च्या जीवाला सतत धोका असतानाही त्याची पर्वा न करता जखमी सैनिकांना मृत्यूपासुन वाचवणे एवढे एकच ध्येय डोळ्यापुढे ठेवून डॉक्टरांनी जी कामगिरी बजावली ती खरोखरीच प्रशंसनीय आहे. अमेरिकेचे नागरिकत्व पत्करले, की उपलब्ध होणाऱ्या फायद्यांबरोबरच डॉक्टरांनी या सैनिकी सेवेसाठी आपणहून वाहून घेतले. हे अमेरिकेत कायम स्थायिक होणाऱ्या सर्व भारतीयांनी मुद्दाम नोंदवावे असे वर्तन आहे. ज्यांना या युध्दांचा आणि अमेरिकन सेनेच्या मानवता सेवेंचा इतिहास माहीत असणारे; शिवाय ज्यांचे नातेवाईक, मित्र लष्करात होते त्यांना हे पुस्तक खूपच आवडेल.

डॉ. देशमुख यांनी लष्कराच्या राखीव दलात भरती होऊन त्यांचे स्वप्न पुरे केले तसेच मायभूमीला न विसरता विविध मार्गांनी भारतातील अनेक प्रकल्पात सहकार्य करून खरा सैनिक कसा असतो हे स्वकार्याने दाखवून दिले. आपली मायभूमी सोडून आलो, की देशभक्ती म्हणजे काय? या विषयावर उलट, सुलट चर्चा सतत ऐकू येते. 'अमेरिकेतील मराठी कर्नल' हे पुस्तक वाचल्यावर मायभूमी आणि कर्मभूमी या दोघांवर प्रेम करणारा खरा देशभक्त कसा असू शकतो याचे चित्र अगदी स्पष्ट होते.

---

'अमेरिकेतील मराठी कर्नल' या पुस्तकाची शिपिंग धरून किंमत $६.५० आहे. पुस्तकाची प्रत मिळण्यासाठी संपर्क:

डॉ. देशमुख, फोन क्रमांक: ६०७-४२६-०००९

***

Serenity Reserve

55+ Active Adult Community

*"Downsize Your Responsibility... Not Your Lifestyle"*

**Stunning & Luxurious community in St. Cloud, suburb of Orlando just 3 minutes from Orlando!**





**In addition to all the high end amenities, which you already know...**

**We also offer**

**MEAL PLANS**

**(Breakfast, Lunch and Dinner) on daily basis for nominal price!**

Managed by HOA Non-Profit Service.

NEW Services for Health & Beauty will also be accessible in our community along with Weekly Spiritual Meetings!! And More!!

Conveniently Located Just 15 minutes South of Orlando Int'l Airport

**Our 10,000 Sq. Ft. Area Fully Equipped Clubhouse will be completed by the end of November!!**



**www.serenityreserve.com**

*407-212-0123 • 317-509-8771*

Serenity Reserve, LLC

2354 Symphony Circle, St. Cloud, Florida 34771

**Owner/Developer: Jagdish Kulkarni, MD**

# आमचा किंडरगार्टनमध्ये प्रवेश

- गौतम पंगू ( मॉन्मथ जंक्शन, न्यू जर्सी)



**ऑडिओ ऐकण्यासाठी संकेतस्थळ:**
**Click here or visit:**
https://youtu.be/588Ev-DP7Il

'लेबर डे'चा वीकेंड झाला, की वातावरणात बदलाची चाहूल लागायला लागते. . उन्हाळा 'अनऑफिशियली' संपतो, 'वर्षाचे आठ महिने कधी संपले कळलं सुध्दा नाही' असं हळहळत लोक डिसेंबरपर्यंतचा स्प्रिंट मारायला सज्ज होतात. हवेत सुखद बोचरी थंडी डोकावायला लागलेली असते, दिवस छोटा होऊ लागलेला असतो, झाडं रंगांची नयनरम्य उधळण करू लागलेली असतात, ग्रोसरी स्टोअर्स आणि कॉफी शॉप्समध्ये ॲपल सायडर आणि पंपकिन फ्लेवरच्या कॉफीचं पुनरागमन होतं, कपड्याच्या दुकानांच्या शेल्फवर छानछान स्वेटर्स आणि कार्डिगन्स हजर होतात. नवरात्र आणि दसरा तोंडावर आलेले असतात, पाठोपाठ एंट्री घ्यायला दिवाळी आणि हॅलोवीन हातात हात घालून विंगेत तयार होऊन उभे असतात. अमेरिकेतला हा फॉल सीझन म्हणजे वर्षातला माझा सगळ्यात आवडता काळ!

या काळात होणारा अजून एक बदल म्हणजे सुट्ट्या संपून मुलांच्या शाळा सुरू होतात. मागची बरीच वर्षं हा बदल आजूबाजूला दिसत असला, तरी प्रत्यक्ष अनुभवायला कधी मिळाला नव्हता. इथं युनिव्हर्सिटीत पीएच. डी. करत असतानाही अंडरग्रॅड्स उन्हाळ्यात सुट्टीवर गेले तरी लॅबमध्ये घासणाऱ्या आम्हा ग्रॅज्युएट स्टुडंट्सच्या आयुष्यात फारसा फरक पडायचा नाही. पण या वर्षी आमची मुलगी किंडरगार्टनला गेली आणि 'शाळा' या संस्थेशी कित्येक वर्षांनंतर पुन्हा संबंध सुरू झाला. उन्हाळ्यात चक्क तिच्या डे-केअरच्या प्री-के क्लासचं कॉन्व्होकेशन होतं, तेही अगदी झगे आणि टोप्यासकट! भारतात आम्हांला आमच्या इंजिनियरिंगच्या कॉन्व्होकेशनलाही झगे आणि टोप्या घालायला मिळाल्या नव्हत्या. आता इंजिनियरिंग करताना आम्हीच शिक्षकांना असंख्य टोप्या घातल्या होत्या, ती गोष्ट निराळी! तर तेव्हा कुणीतरी म्हणालं, "म्हणजे आता तुम्ही अमेरिकन स्कूल सिस्टीममध्ये प्रवेश करणार!" तेव्हा वाटलं होतं, की किंडरगार्टनला तर चालली आहे, कसली सिस्टीम आणि काय! पण शाळेचा पहिला दिवस जवळ यायला लागला आणि जाणवायला लागलं, की प्रकरण वाटतं तितकं साधं नाही!

शाळा सुरू व्हायला काही दिवस असताना तिच्या होणाऱ्या शिक्षिकेनं आम्हा दोघांना पेरेंट्स इंटरव्ह्यूला बोलावलं. त्याआधी इ-मेलमधून एक भलीमोठी प्रश्नावली आली. त्यात 'तुमचे आजोबा कोणत्या शाळेत शिकले होते?' इथपासून 'तुमच्या मुलीला किंडरगार्टनमध्ये पाठवण्यामागं तुमच्या कुठल्या 'होप्स अँड ड्रीम्स' आहेत?' असले कायकाय प्रश्न होते! होप्स अँड ड्रीम्स? माझ्या बालवाडीच्या बाईंनी जन्मदात्यांना माझ्याबद्दल असलं काही विचारलं असतं, तर 'कार्टं घरी फार उच्छाद आणतं, थोडा वेळ बालवाडीत बसलं तर आम्हांला जरा शांतता मिळेल अशी आशा आहे हो! ' असं उत्तर बहुधा मिळालं असतं. पण इथं असं काही लिहायची सोय नव्हती. मान मोडून त्या प्रश्नांची उत्तरं लिहिली. प्रत्यक्ष भेटीत तिच्या शिक्षिकेनं आठवण करून दिली, की शाळेच्या पहिल्या दिवशी बरोबर घेऊन यायच्या गोष्टींची यादी पाठवलेली आहे, त्या गोष्टी न विसरता घेऊन या. कोणतंही काम डेडलाईनच्या आधी एक दिवस चालू करायचं या शिस्तीला अनुसरून ती यादी घेऊन शाळा चालू व्हायच्या आदल्या दिवशी दुकानात गेलो, तर 'बॅक टू स्कूल' सेक्शनमधली सगळी शेल्फ्स अक्षरश: मावळ्यांनी लुटून नेलेल्या गनिमाच्या खजिन्यासारखी रिकामी पडली होती. सगळे पालक इतके जागरूक असतील याची कल्पना नव्हती! शेवटी चार दुकानं हिंडून ते सगळं सामान जमवलं आणि मुलीला घेऊन पहिल्या दिवशी शाळेत गेलो.

'शाळेचा पहिला दिवस' या विषयाबद्दलच्या माझ्या स्मृती फारशा रम्य नाहीत. बालवाडीच्या वर्गाच्या दारात हातपाय आपटत भोकाड पसरून रडणारा मी, 'आत जा' म्हणून विनवण्या करणारी आई, मागं जमदग्नीचा अवतार धारण करून उभे असलेले बाबा, वैतागलेल्या शिक्षिका, आणि ही सगळी मजा नंतर गल्लीतल्या मुलांना तिखटमीठ लावून सांगायला मिळावी म्हणून मुद्दाम पहिलीच्या वर्गातून मान बाहेर काढून बघणारा माझा बालपणीचा कट्टर शत्रू नंद्या असं पहिल्या दिवसाचं चित्र माझ्या डोळ्यासमोर उभं राहतं. त्यामुळं मुलगी या बाबतीत माझा वारसा तर चालवणार नाही ना, अशा धास्तीनंच तिला सोडायला गेलो. पण तिच्या शाळेतलं वातावरण वेगळंच होतं. शाळेच्या दाराशीच सस्मित चेहऱ्यानं मुख्याध्यापिका उभ्या होत्या, आत सगळे वर्ग मुलांच्या स्वागतासाठी छान सजवले होते, वर्गाच्या दाराशी उभ्या असलेल्या शिक्षिका मुलांना अगदी प्रेमानं जवळ घेऊन स्वागत करत होत्या, दोनेक महिन्यांनी एकमेकांना भेटलेली वरच्या वर्गातली चिल्लीपिल्ली नुसती उधळली होती ...या सगळ्या प्रसन्न कोलाहलात तिला वर्गाच्या दाराशी सोडलं आणि अलगदपणे ती आत जाऊन बसलीही. मनात म्हटलं, चला एक गड तरी सर झाला!

पहिल्या दोन दिवसांनंतर शाळेला स्कूलबसनं जाणं सुरू झालं. आतापर्यंत डे-केअरला असल्यामुळं वेळेचं अगदी काटेकोर बंधन नव्हतं, पण आता स्कूलबस चुकली तर आम्हांलाच शाळेत सोडावं लागणार असल्यानं प्रत्येक सकाळ म्हणजे समरप्रसंग बनू लागली. आठ/सव्वाआठ पर्यंत निद्रितावस्थेतून बाहेर यायचं नावही न घेणाऱ्या या छोट्या प्राण्याला मनासारखे कपडे घालून आणि हेअरस्टाईल करून 'फिनिश्ड प्रॉडक्ट' बनवून पावणेनऊ वाजता घराबाहेर काढताना अक्षरश: मिनिटांमिनिटांच्या लढाया लढल्या जाऊ लागल्या आणि मन:शांतीची कसोटी लागू लागली!

एका शुक्रवारी घरी आल्यावर तिच्या शाळेच्या फोल्डरमध्ये बरेच कागद दिसले. तिला चिडवायला मी म्हणालो, "बहुतेक तुला शाळेत होमवर्क मिळालेलं दिसतंय." पण ती शांतपणे म्हणाली, "नाही, ते होमवर्क तुझ्यासाठी आणि आईसाठी आहे." बघितलं तर,

तिच्या टीचरने खरंच आम्हांला एक फोल्डर दिलं होतं आणि 'आम्ही क्लासमध्ये मुलांना एखाद्या विषयाबद्दल सगळ्यांसमोर बोलायला शिकवणार आहोत, तर सोमवारपर्यंत या फोल्डरवर तुमचे फॅमिली फोटो, तुमच्या मुलीच्या आवडीची चित्रं वगैरे चिकटवून पाठवा' असं सांगितलं होतं. मग काय, रविवारी रात्री जागून आम्ही सगळी कापाकापी आणि चिकटवाचिकटवी केली. त्यावर सोमवारी सकाळी तिच्या टीचरकडून "गुड जॉब आईबाबा, आय न्यू यू कॅन डू इट!" अशी प्रतिक्रिया आल्यावर आम्हांलाही गहिवरून आलं!

काही दिवसांनी 'बॅक टू स्कूल' नाईटला तर तिच्या शिक्षिकेनं सगळ्या पालकांना समोर बसवून 'आम्ही वर्गात कायकाय करतो आणि तुम्ही घरी कायकाय करणं अपेक्षित आहे' यावर एक लेक्चरच दिलं. त्यात ' मुलांबरोबर दररोज रात्री अक्षरं लिहा, अंक लिहा, त्यांच्यासमोर दर रात्री पुशप्स काढून व्यायामाचं महत्व त्यांच्या मनावर बिंबवा, त्यांच्याबरोबर बाहेर फिरायला जा आणि त्यांना गप्प रहायला सांगून ऐकू येणारे आवाज लक्षात ठेवायला मदत करा, त्यांच्याबरोबर भोपळा कार्व्ह करून त्यातल्या बियांचे वेगवेगळ्या संख्याचे संच करा'... असल्या कायकाय गोष्टींची यादी होती. बाहेर येऊन आम्ही पालक आपापसात बोलत होतो. एकजण तावातावानं म्हणाला," हे सगळं करायला वेळ कुठून आणायचा? आणि हे आपण करायचं तर शाळेत शिक्षक काय करणार?" शेजारी तीन मुलं शाळेत असलेली एक सुपरमॉम उभी होती, ती हसून म्हणाली," सुरुवातीलाच ही प्रतिक्रिया? हे तर फक्त किंडरगार्टन आहे. पुढं पुढं बघा, मुलांच्या रुटीनमध्ये इतके बिझी व्हाल, की तुम्हालाही पूर्णवेळ शाळेत असल्यासारखंच वाटेल!"

वास्तविक मूल शाळेत जाऊ लागण्याच्या आमच्या या प्रातिनिधिक अनुभवात नवीन काहीच नसलं तरी विचार केला की गंमत वाटते. कित्येक वर्षांपूर्वी भारतातल्या एका लहानशा शाळेत सुरू झालेल्या आमच्या शिक्षणाच्या प्रवासानं अनेक वळणं घेत आम्हांला अमेरिकेत आणून पोचवलं, आणि आता इथं आमच्या पुढच्या पिढीच्या शिक्षणाचा प्रवास सुरू झाला. हा प्रवास तिला कुठवर घेऊन जातो ते काळच सांगेल, पण तिच्या शाळेतल्या एकेक गमतीजमती ऐकताना मन नकळत या दोन्ही प्रवासांतलं साधर्म्य शोधण्याचा प्रयत्न करू लागतं. आणि अक्षरं, अंक आणि आकार यांच्या पहिल्या ओळखीतले दुवे दोन पिढ्यांमध्ये, दोन देशांमध्ये आणि दोन वेगळ्या शिक्षणपध्दतींमध्ये कसे सांधले जाताहेत ते तपासू लागतं.

अर्थात यातले सगळेच फरक सुखावणारे नसतात. उदाहरणार्थ जेव्हा कळलं, की इथं शाळांत अगदी लहान मुलांनासुध्दा 'ॲक्टिव्ह शूटर ड्रिल' शिकवलं जातं, तेव्हा मन एकदम चरकलं! हा भाग आमच्या शिक्षणाच्या प्रवासात कधीच नव्हता- ही अमेरिकेत नव्यानं रुजण्याच्या आमच्या निर्णयाची पुढच्या पिढीला मिळालेली देणगी. इथं रहायचं तर हे वास्तव स्वीकारायलाही शिकलं पाहिजे!

मुलांच्या वयाची वर्षं पुढंपुढं सरकत जातात तशी आईवडिलांचीही शाळा चालू राहतेच. कितीही टाळायचा प्रयत्न केला तरी आयुष्य नेहमी नवीन काहीतरी शिकवत राहतं हेच खरं!

***

# पुनर्जन्म

- अरुंधती सरपटवारी (बाल्टिमोर मेरीलँड)



"आई पुनर्जन्म म्हणजे काय"?

मी स्वयंपाक घरात रवा भाजण्यात मग्न असताना हा अनपेक्षित प्रश्न कानांवर पडला. माझ्या आठ वर्षाच्या अमितनी एक दिवस या प्रश्नांचा पाढा रॉकीच्या मागे पळता पळता कानाजवळ येऊन केला. मी मागे वळून पाहीपर्यंत अमित झर्रकन फॅमिली रूममध्ये पळताना दिसला. इतका गंभीर प्रश्न म्हणजे काही तरी शाळेकरता असेल असं वाटून, मी चट्कन हातातला चमचा आणि रवा, तसाच बाजूला ठेवून स्टोव्ह बंद केला. "का रे, काही प्रोजेक्ट आहे का शाळेंत"? फॅमिली रूममध्ये येता येता मी विचारले. 'नाही आई प्रोजेक्ट नाही. काल ना तुला आणि बाबांना बोलतांना मी ऐकलं. आय नो "जन्म" पण "पुनर्जन्म" म्हणजे काय मला माहीत नाही.' रॉकीशी खेळणं थांबवून त्याने गंभीर होत पुन्हा विचारले, "आई पुनर्जन्म म्हणजे काय सांग ना?" दुसऱ्या मिनिटाला परत त्याचं रॉकीशी खेळणं चालूच झालं. मी त्याला जवळ घेत म्हणाले, हे बघ या रॉकीनी ना गेल्या जन्मी खूप पुण्य केलं म्हणून तो या जन्मीं आपल्या घरी आला. गेल्या जन्मी तो कोणीतरी दुसरा होता. "दुसरा म्हणजे?" मी मनात म्हटलं, स्वारींचा दुसरा प्रश्न म्हणजे आजचा दिवस प्रश्नांचा दिवस आहे तर! माझी पण उत्तरांसाठी तयारी आहे असं मनाला पटवत मी म्हंटले, "तो ना गेल्या जन्मी मुंगी, पक्षी, किंवा कॅट असा काही तरी होता. त्यानं गेल्या जन्मी काही तरी चांगलं म्हणजे पुण्य केलं, आणि नंतर तो डॉग म्हणून जन्माला आला आणि आपल्या घरी आला. इथे आपण त्याचे खूप लाड करतो. पुन्हा जन्म घेणे यालाच "पुनर्जन्म" म्हणतात. समजलं का?

"मी कोण होतो ग गेल्या जन्मी?" त्याचा प्रश्न ऐकून मी थक्कच झाले. मी काही म्हणण्यापूर्वी हसतहसत तोच म्हणाला, "मी ना नक्की डॉग होतो." रॉकी आमच्या जीवनातं आला आणि त्याने सर्वांना आपलंस केलं आणि आम्हीही त्याला कुटुंबात सामावून घेतलं.

या गोष्टीला जवळ जवळ १०-१२ वर्ष झालीत. या काळात रॉकीने सर्वांना प्रेम, मैत्री, आज्ञाधारकपणा वगैरे खूप खूप शिकवले. १५ वर्षाचा "अविस्मरणीय काळ" करून रॉकी एक दिवस आम्हाला सोडून गेला. आमच्या सर्वांवर दुःखाचा पूर लोटला. पण काळाच्या नौकने दुःखावर मात करून किनारा दाखविला.

अमितनं रॉकीचा पट्टा, त्याची खेळणी वगैरे अजूनही नीट सांभाळून ठेवली आहेत. सुट्टीत अमित घरी आला म्हणजे रॉकीचे व्हिडिओ, फोटो, त्याची हुशारी, वगैरे आठवणीत आम्ही मनसोक्त डूबतो. या वर्षी अमितनं अजून काही प्रश्न विचारले,

आणि त्या प्रश्नांबरोबर विचारांच्या वावटळीने मला घेरलं."

"आता रॉकी कुठे असेल ग आई? त्याला कोणता जन्म मिळाला असेल? आपल्याला भेटेल का कुठे? भेटलो तरी तो आपल्याला आणि आपण त्याला ओळखू का? मला ना खुपदा स्वप्नात येतो. अगदी तसाच दिसतो. आय मिस हिम अ लॉट आई!" वावटळी बरोबर डोळ्यांतील पाण्यानी पूराचे रूप घेतले. त्याचं वेळी सेल फोनने वेळेवर घंटी वाजवून माझी सुटका केली. माझ्या मैत्रिणीचा फोन होता. ऑस्ट्रेलिया न्युझीलंडच्या ट्रिपचे पैसे भरले, की नाही हे विचारायला तिने फोन केला होता. ऑस्ट्रेलिया न्यूझीलंडची ट्रिप या गोड शब्दांचे शिंतोडे दुखावलेल्या ओलाव्यात सुखावणारे होते. ट्रिपबद्दल आमचं खूप वेळ बोलणं झालं. अमितच्या प्रश्नांना उत्तरासाठी थांबावे लागणार होते. दुसऱ्याच दिवशी अमित कॉलेजला जाणार या गडबडीत आमचं बोलणं तसंच अर्धवट राहून गेलं.

भरपूर तयारी नंतर महिन्यातच आम्ही ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडला कूच केलं. ऑस्ट्रेलिया कॉस्मोपॉलिटन सिटी, ऑपेरा हाऊस, ब्रिज, विविध स्थळं पाहत, तेथे असलेल्या नातेवाईकांना भेटून शॉपिंग करून न्यूझीलंडला पोहोचलो. न्यूझीलंडचे निसर्ग सौंदर्य मनात साठवत आम्ही एक दिवस सबमरीनमध्ये उतरलो. कोरल रिफ पाहणायची इच्छा आज पूर्ण होणार विचाराने आनंदाला भरती आली होती. सबमरीन लहानच होती. डावीकडे एक सीट आणि उजवीकडे एक सीट आणि त्या डावीकडच्या आणि उजवीकडच्या सीटच्या मागे दहा/बारा सीट्स होत्या. म्हणजे एकूण वीस/बावीस लोक बसण्याएवढी होती. प्रत्येक सीट जवळ मोठी काचेची खिडकी होती. कुठे बसावे समजत नव्हते. नेहमी प्रमाणे मिस्टरांनी मला दिलेला अधिकार पाळून घेऊन मी पहिली सीट घ्यायची ठरविली. मिस्टरांना खुणावीत मी डावीकडे आणि माझे मिस्टर उजवीकडे स्थानापन्न झालो. सबमरिनचा बाहेर असलेला मोठा पंखा अगदी जवळ पाहून माझे मिस्टर नाखुश दिसले. दुसरीकडे बसायचं का? म्हणेपर्यंत सगळ्या सीट्स भरल्या गेल्या. मन थोडं चुकचुकलं. आपण चुकीच्या जागेवर बसलो असे वाटले.

सबमरीनच्या बाहेरच्या पंख्याने एकदम पाण्यात बुडबुडे काढायला सुरवात केली आणि स्पीकरवर गाईड माहिती द्यायला लागला. इतक्यांत एक मोठा मासा माझ्या खिडकी जवळ आला. अगदी खिडकीला लागून होता. गाईड आणि सर्व लोकं एकदम शांत झाले. सगळ्यांचं लक्ष त्याकडे होते. गाईडने त्याचं नाव सांगितलं. तो मांसाहारी आहे असेही सांगितले. त्याचे डोळे मोठे होते आणि तो खिडकीतून आत एक टक पाहत होता.

सबमरीनने आता थोडी गती घेतली होती. अनेक प्रकारचे, रंगाचे मासे, कासव, शार्क आणि कोरल्स दिसत होते पण माझ्या खिडकीजवचा तो मासा मात्र खिडकी सोडून हलत नव्हता. इतर मासे पण खिडकीच्या आसपास यायचे पण लगेच निघून जायचे. हा मासा मात्र माझ्याकडे रोखून पाहत होता.

आधी मी मनातल्या मनात त्याला विचारत होते, कोण आहेस रे तू? तुला काही पाहिजे आहे का? माझ्याकडे तुला द्यायला काही नाही, असा का पाहतो आहेस माझ्याकडे? थोड्या वेळाने मी मोठ्याने त्याच्याशी बोलू लागले. सर्व लोक कौतुकाने आमचे संभाषण ऐकत होते. दहा/पंधरा मिनिटांनंतर तो एकदम निघून गेला. मला वाटलं, गेला असेल त्याच्या मित्रांबरोबर किंवा त्याच्या फॅमिलीकडे. माझे मिस्टर म्हणाले, "हे बघ तो इकडे आलाय." माझे कुतूहल वाढले. मी त्याच्याकडे पाहू लागले आणि तोही पलिकडल्या खिडकीतून मोठे डोळे रोखून माझ्याकडे पाहत होता. एक मिनिटातच ती खिडकी सोडून तो झर्कन परत माझ्या खिडकीजवळ आला. मला काय पण आंत बसलेल्या सर्वांना परत त्याला माझ्याजवळ पाहून खूप आश्चर्य वाटले. सगळे आपली सीट सोडून त्याला पाहायला उठले. पण गाईडने सर्वांना जागेवर पाठविले, आणि आमचं दोघांचं संभाषण परत चालू झालं. सबमरीनची राईड ४५ मिनिटे होती आणि हा माझा नवा मित्र पूर्ण प्रवासांत माझ्या जवळ होता. सबमरीन वळणं घेत होती आणि तोही वळणं घेत घेत खिडकीजवळ थांबत होता. मी त्याला विचारत होते, कोण होतास रे गेल्या जन्मी? का असा तू माझ्याकडे एक टक लावून पहात आहेस? सर्व लोक माझं बोलणं ऐकून थक्क होत होते. राईड संपल्याची घोषणा झाली आणि तो एकदम दिसेनासा झाला.

बाहेर सबमरीनच्या पंख्याने बुडबुड्यांचा लोंढा झाडला आणि आतमध्ये माझा श्वास गुदमरला. दुःखाच्या लोंढ्यानी मला आतमध्ये ओलेचिंब केले. सर्व मंडळी बाहेर पडली. माझा पाय मात्र सबमरीनला चिकटून बसला होता. तो पुन्हा परत येईल, मी त्याला पुन्हा एकदा तरी पाहीन, परत त्याच्याशी बोलेन असे वाटत होते. पण तो पुन्हा दिसलाच नाही. जड पायांनी आणि ओल्या डोळ्यांनी मी कशीबशी बाहेर आले. गेल्या जन्मी कोण होता तो ? तो रॉकी तर नव्हता ना? त्याला काय सांगायचे होते? मला अगदी मनापासून वाटत होतं, तो रॉकीच होता. त्याचा इथे न्यूझीलंडच्या पाण्यात पुनर्जन्म झाला होता. तो आम्हाला भेटला, अमितच्या प्रश्नांना सोडवून गेला. तो मला आता कधीच दिसणार नाही पण त्याचा फोटो व आठवणी मनांत कोरल्स सारखे फुलवून गेला. मी आता अमेरिकेत परत जाणार आणि हा इथे लांब समुद्रापलिकडे! मला मनापासून वाटलं, आज भेटलो ना तसेच पुन्हा कुठे तरी, या जन्मी किंवा पुढच्या जन्मी नक्की भेटू आणि ओळखू. अमितने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं मिळाली. पुनर्जन्म शब्दाची, आनंदाची, भेटीची, प्रेमाची, आठवणींची मोठ्ठी लाट अंगावर घेत मी सबमरीनच्या बाहेर आले, कधी एकदा परत जाते व अमितशी बोलते असे झाले.

"छान सीट निवडलीस" मिस्टरांचे शब्द कानावर घेत मी म्हंटले हो ना, आपण दुसरीकडे बसलो असतो तर कदाचित... नकोच तो विचार, जे होतं ते भल्यासाठीच!

***

# Turmeric, the Golden Spice and a Cure for all Maladies!

- **Balwant N. Dixit**, Ph. D. Professor Emeritus of Pharmacology, University of Pittsburgh, PA



In early thirties I was living in very small villages in India. There were practically no effective medicines to treat any diseases in those days. So when anyone got ill the treatment involved using items from the kitchen or going to the temple to prey for the cure. For example, when one got any respiratory illness the treatment included drinking really hot milk with a teaspoonful of turmeric and sugar.

Was the turmeric, commonly used spice in very small amounts that cured the ailment? No one knew then and even after a lot of research one does not know even now. I immigrated to the USA many years ago and became a Professor of Pharmacology at the University of Pittsburgh. Before that, I was a research staff member within a large group of investigators with expertise in Ayurveda, Pharmacology, Internal Medicine, Bio-chemistry, Pathology and Horticulture in an Ayurvedic Research Unit affiliated with the Department of Pharmacology in Baroda Medical College. Our objective evaluation, of therapeutic effectiveness of over 35 Ayurvedic Medicines in animal models and in human patients, showed nearly total ineffectiveness of these medicines. Recently I became aware that many in the USA are consuming daily 600 mg to 3000 mg of curcumin, the supposedly the active antioxidant ingredient of the turmeric root, as the treatment for diseases such Alzheimer's disease and other dementias, obesity, diabetes, infections, arthritis, Crohn's disease, pancreatitis, ulcers, psoriasis, hepatitis and to ward of future occurrence of these diseases I became concerned. Curcumin is actually a mixture of three closely related curcuminoids, but this mixture is commonly referred as curcumin. After reviewing the relevant published literature I found out the following:

(1) Between the years 1950 and 1970 only 6 papers on turmeric were published. However as of 2016 more than 15,000 manuscripts have appeared.

(2) Curcumin or turmeric is claimed to be an effective treatment for diseases and disorders that include dermatitis, epression, arthritis, cancers and whatever else ails you.

(3) India is the world's largest producer of turmeric.

(4) Turmeric powder contains around 1% curcumin. So to get the commonly used dose 600 - 3000 mg/day a person must consume 6 Gms. (one tsp.) to 300 Gms. (50 tsp.) of turmeric powder each day.

(5) Curcumin is a chemically unstable compound, and very poorly, if at all, absorbed from the G.I. tract in humans even after oral doses as high as 12 gm. A report has claimed that adding black pepper powder increases absorption of curcumin in humans. In reality, the increase is extremely small.

(6) There is a significant disconnect between what appears to be a lot of very promising activity *in vitro*, while use in humans showing virtually no evidence of any health benefits.

(7) No double-blind, placebo controlled clinical trial of curcumin has been successful.

(8)Attempts are being made to "tweak" curcumin so that its bioavailability will be increased.

(9) Clinical Studies with small human population samples with modified curcumin are underway to check whether it has any therapeutic effect against various disorders. But right now it looks like curcumin is a chemical in search of a disease.

I urge those scientifically inclined to read the most recent and relevant research review paper on turmeric published in the J. Med. Chem. (2017, v: 60, 1620-1637) and the newsletter from the Harvard Health Publishing, Mind and Memory Supplement Scorecard (https://www.health.harvard.edu/mind-and-mood/mind-and-memory-supplement-scorecard)

***

# शवपेटीत ३० तास

- **विनता कुलकर्णी** (शिकागो)

अमेरिकेत ३१ऑक्टोबरच्या हॅलोवीन सणाचे वेध महिनाभर आधीच लागतात. दूरदर्शनवर भयप्रद भुताटकीचे चित्रपट व मालिका, गावातील दुकानांमधे चित्रविचित्र अक्राळविक्राळ पोशाखांचे मार्केटिंग आणि त्याला साजेसे देखावे (प्रॉप्स) नजरेस पडतात. शिकागो परिसरात गर्नी उपनगरात वसलेले 'Six Flags Great America' (सिक्स फ्लॅग्स ग्रेट अमेरिका) नावाचे 'थीम पार्क'देखील याला अपवाद नाही. अलिकडेच आगामी हॅलोवीन सणाची जणू नांदी अशी एक विचित्र स्पर्धा पार्कने आयोजित केली होती. स्पर्धेचा विषय होता "30 Hour Coffin Challenge." - शवपेटीत ३० तास राहण्याचे आव्हान! त्यासाठी अर्ज करताना काही अटी पाळाव्या लागणार होत्या.

- अर्जदार व्यक्तीचे वय १८+ वर्षे असावे.
- अर्जदार व्यक्ती अमेरिकेतील ४८ राज्ये (अलास्का आणि हवाई वगळून) आणि डिस्ट्रिक्ट ऑफ कोलंबिया (डी.सी.) यांपैकी एका ठिकाणची कायदेशीर रहिवासी असावी.
- ३० तास बंदिस्त शवपेटीत राहण्यासाठी वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक.
- 'थीम पार्क'ने दिलेल्या- २८ इंच रुंदी आणि ७ फूट लांबी अशा आकाराच्या शवपेटीत अर्जदाराचा देह मावणे आवश्यक.
- अर्ज करण्याची मुदत आणि अजून काही तांत्रिक नियम आयोजकांच्या संकेतस्थळावर दिले होते. ३० तासांच्या कालावधीत शवपेटीत बंदिस्त असताना या स्पर्धेच्या वेळापत्रकानुसार 'बाथरूम ब्रेक्स' व इतर काही आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शवपेटीबाहेर येणे आवश्यक होते.
- संपूर्ण ३० तास स्पर्धकांसोबत कुणीही व्यक्ती, कुठलीही इलेक्ट्रॉनिक यंत्रणा (फोन, गॅजेट्स् इ...) आणि साधे पुस्तकही जवळ असता कामा नये. स्पर्धकांना अर्जासोबत एक लघुनिबंध लिहावयास सांगण्यात आला. निबंधाचा विषय होता- 'तुम्हाला हे आव्हान का स्वीकारायचे आहे?' स्पर्धेसाठी सर्व राज्यांतून तरुण, मध्यमवयीन, वृध्द वयाच्या व्यक्तींचा प्रतिसाद मिळाला.

केवळ इलिनॉय राज्यातून १६००+ अर्ज आले होते. त्यातून चौघांची निवड झाली. त्यापैकी एक नाव होते, शिकागोमधे पूर्वी २०१३मधे 'टीन एजर मिस इलिनॉय'ने सन्मानित, अलिकडेच विद्यापीठाची पदवीधर व कथ्थक-नृत्यांगना असलेली **ईशा जोग**.

शनिवार, ५ ऑक्टोबर, २०१९ या दिवशी, दुपारी १ ते रविवार ६ ऑक्टोबर २०१९, संध्याकाळी ७ असा प्रत्यक्ष आव्हानाचा ३० तासांचा कालावधी असून 'सिक्स फ्लॅग्स ग्रेट अमेरिका'- 'थीम पार्क'च्या मोकळ्या मैदानी परिसरातच स्पर्धा आयोजित केली होती. ईशा जोग सांगते, 'आजवरच्या माझ्या आयुष्यातील हा सर्वात आव्हानात्मक अनुभव होता. आम्हा चारही स्पर्धकांच्या शवपेट्या पूर्णपणे बंद होत्या, फक्त




श्वासोच्छवास करण्यासाठी एक लहानशी फट पेटीच्या वरच्या बाजूला ठेवली होती.' ठरलेल्यावेळी स्पर्धा सुरू झाली. आणि त्याच वेळी पावसाला सुरुवात झाली. पुढेही बरेच तास पाऊस पडत होता. शवपेटीत असलेल्या ईशाचे ब्लँकेट आणि तीही भिजली होती. जसजशी संध्याकाळ मग रात्र होऊ लागली तसतसा हवेतला गारठा वाढला. स्पर्धेचा एक भाग म्हणून 'थीम पार्क'मधे अक्राळविक्राळ- 'मॉन्स्टर'च्या पोशाखात काहीजण स्पर्धकांना घाबरवण्यासाठी त्यांच्या पेट्यांजवळून हिंडत होते. स्पर्धकांबरोबर आलेले नातेवाईक, मित्रपरिवार, थीम पार्कचे पर्यटक, तिथला स्टाफ (कर्मचारीवर्ग) सगळे घरी गेले. मात्र आयोजकांतर्फे दोघेजण 'थीमपार्क'च्या परिसरातच, मात्र शवपेटीत नव्हे तर, ऊबदार व्हॅनमध्ये बसून स्पर्धकांवर देखरेख करत होते.

स्पर्धेच्या नियमांनुसार वेगवेगळ्या विचित्र आव्हानांना तोंड देणे सुरू झाले. त्यातलेच एक म्हणजे, उत्तररात्री ३ वाजता, ऐन थंडीवाऱ्यात, शवपेटीतून बाहेर पडून पळत थीमपार्कमधील भूतबंगला ऊर्फ 'हॉन्टेड हाऊस'मधून फेरफटका मारून येणे. ईशा सांगते, 'त्यावेळी, मात्र मला माझ्या घरच्या ऊबदार बिछान्याची प्रकर्षाने आठवण झाली, आणि स्पर्धा सोडून घरी पळून जावेसे वाटले. शवपेटीत तिला फारशी झोपही लागली नाही. दर ८० मिनिटांनी विविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठी स्पर्धकांना उठवले जात होते. ईशा सांगते, 'बंदिस्त शवपेटीमध्ये असताना, घरी आपल्याला ऊबदार बिछाना आहे, सुखदु:खात बोलायला प्रेमळ कुटुंब, मित्रमैत्रिणी आहेत, नृत्य करण्यासाठी निरोगी शरीर आहे, वाचनासाठी पुस्तके आहेत... इत्यादी विचार मनांत येऊन मला माझ्या भाग्याची प्रकर्षाने जाणीव झाली आणि कृतज्ञता वाटली. त्या ३० तासांचे आव्हान- माझ्यासाठी एक आवश्यक "डीटॉक्स" होता. पण याची मला अगोदर कल्पना नव्हती. आता मागे वळून पाहताना आनंद वाटतोय, काहीतरी नवीन, चांगले करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल.' रात्र जसजशी पुढे सरकू लागली, तसतसा ईशाचा या आव्हानपूर्तीचा निश्चयही दृढ झाला. सकाळ झाली, 'थीम पार्क'चे गेट उघडले गेले. स्पर्धकांचे कुटुंबीय, मित्रमैत्रिणी पाठिंब्यासाठी हजर होऊ लागले. ईशाच्या मते त्यांचे प्रोत्साहन अतिशय मोलाचे होते. चारही स्पर्धकांनी थीमपार्कच्या मैदानात ३० तास शवपेटीत राहण्याच्या आव्हानाची यशस्वी पूर्तता केली. आणि ६ ऑक्टोबर, रविवारी संध्याकाळी ७ वाजता "Rising Ceremony"नुसार चौघेही स्पर्धक शवपेटीतून उठून बाहेर आले. त्यांना आव्हान पूर्ण केल्याबद्दल २०१९ व २०२०




सालासाठी 'थीमपार्क'चे दोन गोल्ड सीझन पासेस, दोन 'हॉन्टेड हाऊस एक्सप्रेस' पासेस, आणि त्यांनी वापरलेली शवपेटीही त्यांना भेट म्हणून देण्यात आली. यंदाच्या हॅलोवीन पार्टीत सजावटीसाठी ईशाने त्या पेटीचा उपयोगही केला.

"30 Hour Coffin Challenge" स्वीकारण्यामागचा ईशाचा विचार होता- काहीतरी वेगळा अनुभव, ज्याबद्दल सर्वसाधारणपणे भीती वाटते असे आव्हान स्वीकारून त्याची पूर्ती करणे. सध्याच्या काळात, सतत फोन, टॅब्लेट्स, टीव्ही, मनोरंजन याविना आपल्यापैकी बहुतेकजण एक दिवसही दूर राहत नाही. त्यामुळे अशा चित्तविचलित करणाऱ्या जीवनशैलीपासून मुक्त, केवळ वर्तमान क्षण जगण्याचा अनुभव घेण्याचे आव्हान तिने स्वीकारले, जरी त्यासाठी "30 Hour C offin Challenge" स्पर्धेतील काही अतिशय टोकाच्या आणि त्रासदायक अटी तिला पूर्ण कराव्या लागल्या. ब्रायन्ट मॅक्गिल एकदा म्हणाला होता, 'जी गोष्ट तुम्हाला त्रासदायक वाटते तीच तुम्हाला अधिक समज येण्यासाठी एक मोठी संधीदेखील असते.'

"जिवासवें जन्मे मृत्यू" हे त्रिकालाबाधित सत्य असले तरी, 'शव', 'शवपेटी', 'मृत्यू' हे शब्द अभद्र मानून, या शब्दांचा उल्लेखही टाळण्याकडे सर्वसाधारणपणे अनेकांचा कल असतो. ईशा जोगची ३० तास शवपेटीत राहण्याच्या आव्हानाची पूर्ती म्हणजे, एकाअर्थी "पार्थिव्यांतच वास हवा, परि दिव्याचा हव्यास हवा" याचे एक उदाहरण!

***

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408


बी. एम. एम. च्या
**ग्रँड रॅपिड्स** येथील
अधिवेशनाच्या उद्घाटन
समारंभाची ब्लू रे
डिव्हिडी आता उपलब्ध
किंमत १० डॉलर्स
(शिपिंगसह)
ऑर्डर करण्यास ई मेल
पाठवा अथवा फोन करा.

BMM of North America
Tel: 267-981-5170
email: brihanmm@gmail.com
Web: www.bmmonline.org



**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

* **VISITORS**
* **H-1 B VISA HOLDERS**
* **PERMANENT RESIDENTS**

**( Some restrictions apply)**

**For more information:**

**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **888 705 8271**

E-mail: padmaja.p.bapat@gmail.com

Website: **visitors-insurance.com**